## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

### मेट्रो-३ च्या प्रवाशांना मिळणार आरे JVLR ते वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स पर्यंत अखंड नेटवर्क कनेक्टिव्हिटी

**मुंबई, ऑक्टोबर 06, 2024:** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) द्वारे आरे JVLR ते वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानकापर्यंत प्रवाशांना नेटवर्क कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. मेट्रो-३ चा प्रवास सुखकर बनविण्यासाठी तिकीट खिडक्या तसेच कॉन्कोर्सजवळ ही सेवा प्रवाशांना उपलब्ध असेल. वायफाय सेवेमुळे त्यांना तिकीट खरेदी करणे सुलभ होणार आहे। सध्या ही सेवा तिकीट खिडक्या व कन्कोर्स जवळ उपलब्ध असली तरी भविष्यात प्लॅटफॉर्म आणि भुयारात देखील वायफाय चा उपयोग प्रवाशांना करता येणार आहे.

प्रवासी मोबाईल ॲप्लिकेशन, तिकीट काउंटर, तिकीट वेंडिंग मशीन आणि एमएमआरसी वेबसाइटवरून एकेरी आणि परतीच्या प्रवासाची तिकिटे खरेदी करू शकतात. येण्या-जाण्याच्या प्रवासासाठी तिकिटे ३ तास वैध राहतील. स्थानकांमध्ये तिकीट खरेदी करणारे प्रवाशी त्यांचे तिकीट कोणत्याही अडचणीशिवाय बुक करण्यासाठी उपलब्ध मोबाईल आणि वायफाय नेटवर्क वापरू शकतात.

MMRC लवकरच सर्व स्थानकांवर आणि ट्रेनच्या आत वेगवेगळ्या सेवा प्रदात्यांकडून अखंड 4G आणि 5G मोबाइल नेटवर्क कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणार आहे.

मेट्रो-३ चे मोबाईल अप MetroConnect3 डाऊनलोड करण्यासाठी पुढील लिंक उपलब्ध आहेत.

गुगल प्ले स्टोअर : https://play.google.com/store/apps/details?id=com.metroconnect3.app

अँपल अँप स्टोअर : https://apps.apple.com/us/app/metroconnect3/id6723876321

संकेस्थळ-: https://mmrcl.com

**For further information please contact: -**

**Vaidehi Khadse**
**9028543087**
**vaidehi.more@mmrcl.com**

**Niti Tamse**
**8369727364**
**niti.tamse@mmrcl.com**